INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
February-2019 Special Issue – 139

## ग्रामीण साहित्य : एक चिंतन

अतिथी संपादक
डॉ. आर. जे. टेमकर
प्राचार्य,
दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

कार्यकारी संपादक
डॉ. जालिंदर कानडे (मराठी विभागप्रमुख)
डॉ. चंद्रकांत काळे
डॉ. सुभाष देशमुख
दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**February -2019 Special Issue - 139**

## ग्रामीण साहित्य : एक चिंतन

**अतिथी संपादक**

डॉ. आर. जे. टेमकर
प्राचार्य,
दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

**कार्यकारी संपादक**

डॉ. जालिंदर कानडे (मराठी विभागप्रमुख)
डॉ. चंद्रकांत काळे
डॉ. सुभाष देशमुख
दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

**मुख्य संपादक**

डॉ. धनराज धनगर (येवला)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

ISSN : 2348-7143
February-2019

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 139 - ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | लेखक/ लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मराठी ग्रामीण कादंबरीतील सहकाराचे चित्रण | डॉ. सदाशिव सरकटे | 5 |
| 2 | १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | डॉ. सुभाष शेकडे | 12 |
| 3 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | डॉ. माहेश्वरी गावीत | 16 |
| 4 | मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना, स्वरूप व प्रेरणा | डॉ. मच्छिंद्र मालुंजकर | 23 |
| 5 | १९६० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेचा विकास | डॉ. अनिल गर्जे | 32 |
| 6 | गत दशकातल्या ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | डॉ. कैलास दौंड | 38 |
| 7 | 'प्रार्थनेची घंटा' मधील समाजदर्शन | प्रा. लक्ष्मण कोठावळे | 45 |
| 8 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरी : प्रेरणा व स्वरूप | डॉ. जालिंदर कानडे | 49 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | 52 |
| 10 | १९६० नंतरचे ललित लेख, ललित गद्य : काही निरीक्षणे | डॉ. सुभाष देशमुख | 56 |
| 11 | मराठी ग्रामीण कादंबरी व समाजपरिवर्तन | डॉ. द. के. गंधारे | 58 |
| 12 | मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री संघर्ष | डॉ.चंद्रकांत काळे | 62 |
| 13 | ग्रामीण साहित्य आणि मुकुंदराव पाटील | डॉ.संजय दरवडे | 66 |
| 14 | 'पाणी' धरणग्रास्तांचे जीवन चित्रण करणारी कादंबरी | डॉ. ए.बी.उगले | 70 |
| 15 | मराठी ग्रामीण कथांतील भाषिक वेगळेपण | डॉ. विठ्ठल जंबाले | 75 |
| 16 | मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वेगळेपण | डॉ. निवृत्ती मिसाळ | 81 |
| 17 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | डॉ. अशोक डोळस | 83 |
| 18 | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची ग्रामीण कथा : एक शोध | डॉ. सुभाष पुलावळे | 87 |
| 19 | ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप | डॉ. देविदास शेटे | 92 |
| 20 | ग्रामीण कादंबरीतील बदलते स्त्री चित्रण | डॉ. अनिता आढाव | 96 |
| 21 | ग्रामीण साहित्यातील राजकीय चित्रण | डॉ. व्ही. बी. बनसोडे | 101 |
| 22 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता | डॉ. जी. पी. बोडखे | 104 |
| 23 | १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे रचनाविशेष | डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 107 |
| 24 | ग्रामीण साहित्य : स्वरूप, प्रेरणा आणि वैशिष्ट्ये | डॉ. निलेश खरात | 110 |
| 25 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | डॉ. रंजना कदम | 114 |
| 26 | १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतील स्त्री भावनांचा आविष्कार | डॉ. वसंत सपकाळ | 119 |
| 27 | मुस्लिम साहित्यिकांच्या ग्रामीण मराठी कथा : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. रमेश खिळदकर | 122 |
| 28 | १९९० नंतरचे मराठी साहित्यातील बदलते संदर्भ | प्रा. डी. बी. हारकर | 125 |
| 29 | मराठी ग्रामीण कादंबरी | डॉ. पोपट सिनारे | 128 |
| 30 | प्रयोगशील कादंबरीकार डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे | श्री. संतराम साबळे | 132 |
| 31 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | डॉ. संभाजी शिंदे | 135 |
| 32 | इंद्रजित भालेराव यांची ग्रामीण कविता (पीकपाणी व दूर राहिला गाव) | डॉ. कार्तिकी नांगरे | 140 |
| 33 | मरती ग्रामीण कविता | राजेश नेटके | 144 |
| 34 | 'धग' : एक विलक्षण वास्तव | प्रा.महेंद्र पाटील | 147 |
| 35 | ग्रामीण नाटक वाङ्मय | डॉ. राखी सलगर | 152 |
| 36 | मराठी ग्रामीण कथेची वाटचाल | प्रा. पी. टी. कांबळे | 154 |
| 37 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | हरेश शेळके | 157 |



Website – www.researchjourney.net Email - researchjourney2014gmail.com

CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 38 | मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना व स्वरूप | प्रा. रामदास कातकडे | 161 |
| 39 | ग्रामीण साहित्य प्रेरणा व स्वरूप | हेमंत दळवी | 167 |
| 40 | ग्रामीण कादंबरीतील राजकारणाचे प्रतिबिंब व सध्यस्थिती | डॉ. संतोष जाधव | 170 |
| 41 | मुस्लिम कवींच्या ग्रामीण कवितेची वाटचाल | डॉ. राजाराम सोनटक्के | 175 |
| 42 | बदलती खेडी आणि मराठी ग्रामीण साहित्य | अनिल पानखडे | 178 |
| 43 | मराठी ग्रामीण कथा वाङ्मयाचा उदय व विकास | प्रा. एस. व्ही. क्षीरसागर | 181 |
| 44 | गुन्हेगार जाती-जमातींच्या कादंबरीतून प्रकटलेले ग्रामीणत्व | डॉ. आकाश पवार | 185 |
| 45 | मराठी ग्रामीण कथेची वाटचाल | प्रा. पी. टी. कांबळे | 189 |
| 46 | आदिवासी पारधी आत्मकथनाचे स्वरूप | प्रा. राजेंद्र गवळी | 192 |
| 47 | मराठी ग्रामीण कथा : पाणभवरे (आनंद यादव) | सबाना तडवी | 196 |
| 48 | ग्रामीण साहित्याची संकल्पना | प्रा. व्ही. जे. भाग्यवंत | 211 |
| 49 | 'इमान' कवितेचे आशयसौंदर्य | डॉ. वि. दि. धनवे | 214 |
| 50 | जगदीश कदम यांच्या कवितेतील प्रतिमा | डॉ. मिलिंद वाव्हळे | 217 |
| 51 | ग्रामीण कथेचे स्वरूप आणि विकास | कविता फुंदे | 220 |
| 52 | मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना, स्वरूप व प्रेरणा | डॉ. अविनाश ताटे, प्रा. अरविंद इंगळे | 223 |
| 53 | मराठीतील ग्रामीण कथा | प्रा. सुरेश नजन | 227 |
| 54 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | अमर तांबे | 230 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवले आहेत. प्रकाशक, संपादक यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय यातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या विशेषांकातील लेखांतून/संशोधन निबंधांतून व्यक्त झालेली मते ही त्या संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत, त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ स्वामित्व हक्काविषयीची (कॉपी राईट्स संदर्भातील) सर्वस्वी जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*



CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 139 - ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना व स्वरूप

प्रा.रामदास पंढरीनाथ कातकडे
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्ट्स, कॉमर्स
अँण्ड सायन्स कॉलेजे शेवगाव.
ता.शेवगाव जि.अहमदनगर.
मो.नं. ९०२१५६५३७७

**प्रस्तावना**

मराठी साहित्यात स्वातंर्त्यप्राप्तीनंतरच विशेषत: १९६० नंतर जे ठळक वाङमय प्रवाह उदयाला आले, त्यापैकी ग्रामीण साहित्याचा प्रवाह लक्षणीय असा आहे. महात्मा जोतीराव फुले यानी या देशातील शूद्रातिशूद्र समाजाच्या उन्नतीसाठी जी विचारसरणी मांडली, तीच ग्रामीण साहित्याची वैचारिक व तात्विक भूमिका असायला हवी.

ग्रामीण हा शब्द वर्णनवाचक आहे की मूल्यवाचक आहे. ग्रामीण जाणीवा म्हणजे काय, ग्रामजीवनाचे स्वरूप, त्यातील जातिबद्ध समाजरचना आणि कुटुंबव्यवस्था ,ग्रामजीवन आणि ग्रामीण साहित्याचा संबंध कोणता आहे, या सर्व गोष्टी आपल्याला मराठी ग्रामीण साहित्यात पाहायला मिळतात. १९२० च्या आसपास 'ग्रामीणता' या संज्ञेने ध्वनित होणारे अर्थ मर्यादित होते. 'ग्रामीण' आणि 'नागर' या दोन संज्ञा कधी निर्माण झाल्या ते निर्णायकपणे सांगणे अवघड आहे. मानवी स्वभाव हा इथून–तिथून सारखाच असतो असे आपण म्हणतो खरे परंतु परिस्थितीप्रमाणे आणि प्रदेशाप्रमाणे त्याला वेगळे कंगोरे प्राप्त होतात हेही आपण कबुल करतो. साधारणत: मराठीमध्ये जाणीवपूर्वक 'ग्रामीण' साहित्याच्या निर्मितीला १९२० नंतर प्रारंभ झाला असे म्हटले जाते. कारण १९२० च्या दरम्यान 'ग्रामीण' जीवन ठळकपणे वेगळे असल्याचे जणवु लागले होते. महात्मा गांधी यांनी 'खेड्याकडे चला' अशी हाक या ऐतिहासिक टप्प्यावर दिली. त्याचे कारण ही या बदलत्या अर्थव्यवस्थेत आहे. म्हणूनच ग्राम इलाखा केंद्रस्थानी ठेऊन देशाच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन केले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

औद्योगिकरणाचा वाढता वेग आणि ग्रामीण भागाचे क्रमाणे मागासलेपण यांच्यामध्ये निश्चितच काही नाते आहे. या वास्तवाचा प्रखर अविष्कार झाला आहे तो महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथामध्ये शेतकरी आणि एकूण ग्रामीण इलाखा कसा सर्वबाजूनी होरपळून निघतो आहे याचे फार प्रभावी चित्रण त्यांनी केले आहे. १९२० च्या आसपास सुरु झालेले हे ग्रामीण साहित्य आजही विविध अंगांनी विकसित होत आहे या साहित्याचा विशेष म्हणजे कविता , कथा , कादंबरी या वाङ:मय प्रकारातून विपुलपणे लिहिले जात आहे.

**ग्रामीण म्हणजे काय ?**

मराठी वाङ:मयाच्या समृद्धीमध्ये ग्रामीण साहित्याने भरच टाकलेली आहे. तरीही 'ग्रामीण' म्हणजे नेमक काय ? याबद्दल मात्र संभ्रम आहे. विशेषत: ग्रामीण साहित्याच्या चळवळीबद्दल जेव्हा चर्चा सुरु झाली. तेव्हापासून ग्रामीण साहित्याबद्दल काही एक प्रतिकुलही बोलले जाऊ लागले. याचा अर्थ असा की, गेल्या ८०वर्षापासून ग्रामीण साहित्य निर्माण होत आहे. मराठी साहित्यात त्यामुळे लक्षणीय भर पडत आहे , तरीही ग्रामीण साहित्याबद्दल विस्ताराने लिहिले गेले नाही.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 139 - ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

खरे म्हणजे कुठल्याही साहित्यकृतीमागे ज्याप्रमाणे लेखक उभा असतो, त्याप्रमाणे त्या साहित्यामागे आणि लेखकामागेही एक स्वातंत्र असे अनुभवविश्व उभे असते. त्यात मग प्रदेश येईल, त्या प्रदेशातील जीवन येईल, तिथल्या प्रथा येतील, तिथले समाजजीवन येईल, कारण लेखक काही कुठल्या पोकळीत लिहित नसतो. म्हणून ग्रामीण साहित्य समजून घ्यायचे असेल तर 'ग्रामीण' म्हणजे काय, हेही नीटपणे समजून घेतले पाहिजे. परंतु 'ग्रामीण' म्हणजे काय ?

'ग्रामीणत्व' नेमके कशात असते, याची मराठीमध्ये चर्चा झालेली आहे, असे दिसत नाही. पुष्कळदा 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' यामध्ये काही फरक नाही. असे म्हटले गेले, तर कधी कथेसाठी 'ग्रामीण' आणि कादंबरीसाठी प्रादेशिक असे विशेषण वापरले गेले. याशिवाय ग्रामीण म्हणजे अज्ञान अंधश्रद्धा आणि रूढीप्रियता असेही म्हटले गेले. यामागे ग्रामीण माणसाविषयी शहरी माणसाच्या मनात असलेले समज गैरसमज ही असू शकतात. कारण अज्ञान अंधश्रद्धा आणि रूढीप्रियता ही काही केवळ ग्रामीण समाजाचीच लक्षणे आहेत, असे नाही. आज मुंबई सारख्या महानगरामध्ये किती दारिद्रय आहे हे येथे सांगण्याचे कारण नाही. तसेच अंधश्रद्धा आणि रूढीप्रियता हे तर एकुण भारतीय समाजाचेच वैशिष्ट्य होय. शहरामधून वाढणारी मंदिराची संख्या आणि त्या मंदिरापुढल्या वाढत्या रांगा काय सांगतात? मुंबईसारख्या औद्योगिक नगरी मध्ये 'जात पंचायती' अजूनही कार्यरत आहेत. परंतु केवळ रूढीप्रियता व अंधश्रद्धा म्हणजे ग्रामीण जीवन नव्हे! याच्यापलीकडे कुठेतरी ग्रामीणतेचा शोध घेवा लागतो. आणि हा शोध घेतांना प्राचीन काळापासून झालेली. खेड्याची घडण लक्षात घ्यावा लागते. या घडणीमधून जीवन जगण्याची एक रीत साकारली गेली. ही रीत म्हणजे ग्रामीणत्व असे म्हणता येऊ शकेल. ही रीत प्राचीन काळापासून नागर जीवनापेक्षा वेगळी आहे.

**ग्रामीण साहित्य**

ग्रामीण साहित्य निर्मितीमागे ग्रामीण जाणीव असते. ग्रामीण जीवनाचे प्रश्न, ग्रामीण माणसाचे प्रश्न, ग्रामीण माणसाची सुख–दुखे, अशा–आकांक्षा याचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात उमटत असते. आजच्या उद्योगप्रधान, यंत्रनिष्ठ शहरी संस्कृतीपेक्षा ग्रामीण जीवन अत्यंत निराळे आहे. ग्रामीण जीवन शेतीनिष्ठ आहे. ग्रामजीवन आणि ग्रामीण साहित्य याचे नाते अतूट आहे. भारतीय समाजाचा खेडे हा मुख्य घटक आहे. ह्या खेड्यातील गावगाड्याचे स्वरूप, जातीबद्ध समाजाचे रूप आणि कुटुंब व्यवस्था लक्षात घेतल्याशिवाय ग्रामजीवनाचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार नाही. ज्या समाज व्यवस्थेने शेतकऱ्याला , कष्टकऱ्याला आगतिक केले आहे. त्या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणे आवश्यक आहे. ह्यासाठी ग्रामीण साहित्य चळवळीची गरज आहे. ग्रामीण संस्कृती ही कृषीनिष्ठ संस्कृती आहे. आणि कृषी निसर्गावर आधारलेली आहे. कृषी आणि निसर्गचं अतूट नात आहे. ह्या नात्याचं नावच 'ग्रामीण साहित्य' असे आहे.

ग्रामीण जीवनातील व्यथा, वेदना, संघर्ष, राजकारण ,कृषिजीवन, सन, उत्सव, सांस्कृतिक खेळ या सर्व गोष्टी साहित्यातून शब्दबद्ध करण्यासाठी ग्रामीण साहित्यप्रवाह निर्माण झाला. स्वातंत्र प्राप्तीनंतर ग्रामीण भागातील तरुण मोठ्य प्राणावर शिक्षण घेऊ लागले. त्यामुळे संवेदनशील सर्जनशील तरुण पिढी आपले जीवानानुभव शब्दांकित करू लागली. त्यावेळी त्यांना जाणवले की आपण वाचन करीत असलेले उच्च्यवर्गीयांचे साहित्य आणि आपले साहित्य यात खूप फरक आहे. आपण ज्यांचे साहित्य वाचले त्यांना कधीही आपल्या समाजाविषयी आपल्या जीवनाविषयी आत्मीयता वाटली नाही. त्यामुळे आपल्या समाजाबद्दल गांभीर्याने लिखाण झालेले नाही. या समाजातील व्यक्तीचे प्रश्न त्यांच्या भाव–भावना, सुख–दुखे त्यांना कळली नाहीत त्यामुळे

निर्माण झाले ते कल्पनेतील ग्रामजीवन जिथे की, वास्तवतेचा अंशच नष्ट झाला होता. असे ग्रामीण जीवन आपण लिहितो तेच खरे ग्रामीण साहित्य असा समज स्वत:चा आणि वाचकांसाही करून दिला होता.

नव्याने लिखाण करणाऱ्या ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या तरुणांना जाणवले की मी माझा समाज या साहित्याचा विषय का होत नाही. आमचे जीवन आणि आमच्या जीवनातील समस्या, सुख–दुख यांना काहीच का अर्थ नाही. अशा अनेक प्रश्नांनी ते अस्वस्थ होते. तेव्हा त्यांना जाणवले की सर्व गोष्टीला एक शोषणाचा संदर्भ आहे. उच्च्यवर्णीय समाज निम्न स्तरातील समाजाचे शोषण करतो. तसेच शहरातील माणसे ग्रामीण, दीनदुबळ्या, दर्याखोर्यात राहणाऱ्या माणसाचे शोषण करतात.

**मराठी ग्रामीण साहित्य संकल्पना**

ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष चित्रण ज्या साहित्यातून झाले आहे अशा साहित्याचा शोध घेत आपणांस भेट ज्ञानेश्वर कालापर्यंत जाता येऊ शकते. दृष्टांतपाठामधून आलेल्या काही कथांमधून शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण नकळत का होईना झाले आहे. असे सांगता येऊ शकते. आधारीचे परिसाचा दृष्टांत हे त्याचे उत्तम उदाहरण होय. याच पद्धतीने नामदेव, तुकराम, एकनाथ इ. संताच्या अभंगामधून ग्रामीण जीवनाच्या काही छटा प्रकाट होतांना दिसतात.

असे असले तरी जाणीवपूर्वक ग्रामीण जीवनदर्शक घडवू इच्छिणाऱ्या साहित्याचा सळग प्रवाह १९२० नंतरच दिसतो. असे म्हनावयास हरकत नाही. ग्रामीण साहित्याने मराठी वाङ:मयामध्ये मोलाची भर घातली आहे. ग्रामीण साहित्याने अनेक धर्मजाती, संप्रदाय भाषा, लिंगभेद, समता, स्वातंर्त्य, बंधुता, न्याय, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, भयमुक्त समाजजीवन या सर्व घटकांनी युक्त असणारे साहित्य हे मराठी साहित्याला मिळालेली सोन्याची खानच आहे. बदलत्या ग्रामीण संस्कृती बरोबर ग्रामीण साहित्यही बदलत आहे. याची जाणीव आपल्याला ग्रामीण साहित्य वाचतांना जाणवते.

ग्रामीण साहित्याची सुरवात जरी आपल्याला एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सापडत असली तरी प्राचीन वाङ:मयामध्ये संत चोखामेळ्याच्या अभंगापर्यत जाऊन त्याचा विस्तार करता येतो. यानंतर महात्मा फुले यांचा शेतकऱ्यांचा आसूड मध्ये सापडतात. त्यांनी शेतकऱ्यांच्या गरीबीचे कष्टमय जीवन संघर्ष चितारला आहे. बदलणाऱ्या समाज व्यवस्थेत आणि अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचे आणि येथील कष्टकारयांचे होणारे शोषण हा महात्मा फुले यांच्या कायमच चिंतनाचा आणि कार्याचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. १८७७ मध्ये 'दीनबंदू' या नियतकालिकांमधून त्यांनी बळीबा पाटील ही कादंबरी लिहिलेली आहे. मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी लिहिण्याचा हा एक प्रयोग होता, महात्मा फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. त्या काळात या साहित्याची दाखल घेतली गेली नसली तरी १९२० नंतरच्या ग्रामीण साहित्याची मात्र बऱ्यापैकी दखल घेतली गेली होती. नाविन्याचा भाग म्हणून असेल अगर चांगले लेखन म्हणून असेल त्या , त्या साहित्याची प्रासंगिक म्हणून का होईना दाखल घेतली गेली होती. किंबहुना असे म्हणता येईल की निदान या साहित्याच्या विरोधात तरी कोणी बोलत नव्हते, परंतु १९७० नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरु झाली आणि एकूण मराठी साहित्य ग्रामीण साहित्याच्या बाबतीत प्रतिकूल अभिप्राय नोंदवू लागले.

शतकानुशतकापासून गुलामी, जातीव्यवस्था, धर्म, धर्मग्रंथ लाचारी, दारिद्रय कोरडा, दुष्काळ ,ओला दुष्काळ यात अडकून पडलेल्या ग्रामीण समाजाच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम महात्मा जोतीबा फुले यांनी केले महात्मा जोतीबा फुले याच्या विचारातून प्रेरणा घेऊन अनेक ग्रामीण लेखन करू लागले पण नंतर १९२० नंतर महात्मा गांधीनी 'खेड्याकडे चला' असा नारा दिला आणि ग्रामीण साहित्य गांधीवादाकडे झुकले. ग्रामीण

साहित्याचा पृथकपणा त्यातील ग्रामीणतेच्या जाणीवेमध्ये आहे. ग्रामीण भागातील शिकेलेल्या पिढीत १९६० च्या आगेमागे संस्कृतीक भान आले. आपण अनुभवलेले, अनुभवत असलेले खेडे आणि जीवन हा साहित्याचा विषय होऊ शकतो. खरे म्हणजे ग्रामीण जीवनासंबंधी कृषीव्यवस्थासंबंधी ग्रामीण जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नासंबंधी आणि एकूण ग्रामीण पर्यावरणासंबंधी वैचारिक स्वरूपाचे विपुल लेखन झालेले आहे. महात्मा फुले यांचे लेखन म्हणजे ग्रामीण साहित्याचा पहिला परंतु सशक्त अविष्कार होय. येणाऱ्या भविष्य काळात ग्रामीण जीवनात झपाट्याने बदल होत आहे. यंत्र युगातील विविध सोयी आणि सुविधा आता खेड्यपाड्या पर्यंत पोहचत आहेत. त्याचबरोबर शहराशी आदान प्रदान ही खुप वाढले आहे. ग्रामीण माणूस आता खूपच सजग झाला आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याचा वेगळा प्रवाह मानण्याची आवशकता काय. असे ही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**ग्रामीण साहित्याचे स्वरूप**

साहित्यादी ललितकला तुम्हा–आम्हाला जीवनाचा अर्थ उलगडून दाखवित असतात. आणि तुमची–आमची जीवनविषयक दृष्टी विकसित करीत असतात. प्रत्येक कालखंडात नव्या जानिवांबरोबर नवे घाट येत असतात, त्याचबरोबर नवे प्रवाह उदयाला येतात. हे बदल सर्वच क्षेत्रात घडून आणतात. व हे बदल दुहेरी असतात. एक व्यापक पातळीवर बदल होत असतो. व दुसरा बदल अंतस्वरुपात होत असतो. साहित्यात जे बदलते प्रवाह उसळत असतात. त्यांचे नाते सामाजिक संरचनेशी असते. मराठी साहित्याचा वाचकवर्ग आणि त्याची वाङ:मयीन जाणसंस्कारित करणारा लेखकवर्ग प्रामुख्याने पांढरपेशा मध्यमवर्गातीलच होता. म्हणून अपरिहार्यपणे मध्यमवर्गाची सुख–दुखे, अशा–आकांक्षा आणि त्यांची स्वप्ने मराठी साहित्यातून प्रतिबिंबित झाली.

१९६० नंतर ग्रामीण साहित्यिकांची नवी पिढी नव्या भूमिका घेऊन लिहू लागली. वस्तुत ग्रामीण साहित्याला जे तत्वज्ञान हवे आहे ते. महात्मा फुले यांच्या तत्त्वज्ञानापासून शोधता येईल. महात्मा फुल्यांनी आपल्या विचारातून मूलगामी मानवतावाद मांडला त्याचे कार्य केवळ सुधारणावादापुरते मर्यादित नव्हते. त्यांचा प्रवास बंद्खोरीपासून ते सम्यक परिवर्तना पर्यंत होता. जी प्रचलित समाजव्यवस्था होती. तिच्यात त्यांना अमुलाग्र परिवर्तन करायचे होते. ज्या नवीन समाजव्यवस्थेचे चित्र त्यांनी कल्पिले होते त्याचे स्वरूप त्यांनी सूक्ष्मरीतीने विशद केले. विशेषत: या नव्या समाजव्यवस्थेसाठी त्यांनी तळागाळातील सामान्य जनतेची सत्यशोधक समाजाची चळवळ उभी केली. याच काळात शूद्रांना व अतिशुद्रांना आपले गमावलेले माणूसपण पुन्हा लाभले. ज्या प्रमाणात दलित साहित्यात वैचारिक, आत्मकथनापर लेखन करण्यांची एक दमदार पिढी निर्माण झाली त्याच्या तुलनेत ग्रामीण साहित्यात निर्माण झाली नाही. एक उदारमतवादी ,मानवतावादी विचार घेऊन वाटचाल करता आली नाही आज काही प्रमाणात बदलतांना दिसते ग्रामीण जीवन १९७० नंतर वास्तव पातळीवर चित्रित केलेले विविध प्रदेश त्या प्रदेशाची संस्कृती , भूगोल, रूढी ,परंपरा, भाषा व्यक्ती त्याचे विनोद यांच्या चित्रण येते. ग्रामीण जीवनातील विषमता ,जातीयता, शोषण , दारिद्र्य यांचे फारसे चित्रण येत नाही. त्यामुळे वाचकांच्या मनात केवळ हळहळ निर्माण होते. पण या समस्येतून मार्ग काढण्यासाठी तो पेटून उठत नाही.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात जे विचारमंथन सुरु झाले त्या विचारांचे केंद्र, माणूस , होते. माणूस आणि निसर्ग , माणूस आणि समाज , माणूस आणि विश्व ,माणूस आणि माणूस , माणूस आणि कुटुंब अशा कितीतरी नात्यांचा शोध विचारवंत घेऊ लागले. असे दिसते. माणसांचा सर्वांगीण विकास व्हावा अशा समाजाचे



CamScanner

चित्र त्यांना अपेक्षित होते. ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने माणसाचे साहित्य आहे. माणूस स्वत:ला बदलू शकतो तसेच तो आपल्या भौवतीचे वास्तव विचाराने आणि कृतीने बदलू शकतो हे प्रमुख विचासुत आहेत. तसेच पहिले तर बदल हा मानवी जीवनाचा धर्म आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत की बदल हाच इतिहासाचा अर्थ आहे. म्हणजे परिवर्तनवादी, तत्वज्ञान ग्रामीण साहित्याला अंगिकारावे लागेल.

आज सांस्कृतिक खेड विस्कटून चाललेले आहे. श्री.ना.धो. महानोर आपल्या प्रार्थना दयाघना या कविता संग्रहाच्या प्रस्थावानेत लिहितात दृ गेल्या आठ–दहा वर्षामध्ये पाऊसपाणी निसर्ग खूप बदलला. पाण्याशिवायचे सलग दुष्काळ पडले, देशात व महाराष्ट्रात घोर दुष्काळी वणव्याने माणसे शेतीवाडी ,पीकपाणी राज्यकर्ते सगळे काही छिन्न–वीछिन्न करून टाकले शेतीच्या उत्पन्नाशिवाय उध्वस्त खेड्यांची झालेली मोडतोड कित्येक वर्ष भरून निघणे कठीण आहे. श्री.ना.धो. महानोरांना हे विशेषत: जाणवते या कविमनाचा माणसावर आणि लोकशाहीवर अधिक विश्वास आहे. पण त्याचबरोबर आजची समाजव्यवस्था आत्यंतिक स्वार्थी आणि भ्रष्ट झालेल्या बहुसंख्य लोकांनी व्याप्त तर आहेत, पण थंड शासन आणि त्यापेक्षा थंड राज्यकर्ते यांनी ग्रामीण माणसाला पार होरपळून टाकलेले आहे. त्यामुळे गरीब शेतकरी ,शेतमजूर आणि खेड्यातले व्यवसायिक सर्व तऱ्हेने शोषणाचे बळी ठरले आहेत. श्री.ना.धो.महानोर म्हणतात.

खेड्याकडे चला कोणासाठी, कशासाठी
अडाण्यांच्या हाती जोर, काळी भोर काठी
त्यांच्या वड साउलीत ,लांडग्यांचा तळ
शुद्र स्वार्थासाठी केली मानसं गढूळ
कोणी मरो,तरो यांच्या आसनांचा खेळ
महात्म्यांच्या गाथेखाली पेटविला जाळ
यांच्या करणीने सत्य छिन्नविछिन्न झाले
भर पावसात माझे गाव ओस झाले !

कवीची वेदना 'माझे गाव ओस झाले' या ओळीतून पाझरते आहे. ग्रामीण साहित्यालाही व्यथा जाणवते हि व्यथा ओटीपोटी बाळगून ग्रामीण साहित्याला परिवर्तनासाठी आपला लढा उभा करावा लागणार आहे.

ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात सध्या वेगळे वळण घेतलेले दिसून येते. यामध्ये आपल्याला प्रकर्षाने असे जाणवते की, ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण भागातील अनेक प्रश्न आणि समस्या पुढे आणल्या जात आहेत. त्याचे मध्यम म्हणून कथा–कादंबरी–कविता अशा काही साहित्य प्रकारांचा वापर केला जातो. साहित्य प्रकारच्या माध्यमातून हे प्रश्न पुढे आणले जातात. किंवा ती साहित्यकृती त्यासाठी जबाबदार ठरते. आणि त्याच बरोबर त्या लेखकाचा संघर्ष जर त्या बदलाच्या दृष्टीने असेल तर ते अधिक पुढे यातून त्यातून जे अन्याय किंवा समस्या पुढे येतात त्यावर काम करणारे आपल्याला काही प्रमाणात दिसून येतात. यामध्ये उदाहरण बघायचे झाल्यास आनंद यादवांची 'गोतावळा' हि कादंबरी घेऊ शकतो. तंत्रज्ञानाचा शेतीवर झालेला परिणाम गोतावळा या कादंबरीमध्ये आनंद यादव यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न अतिशय प्रकर्षाने मांडले आहे. पण त्याचबरोबर ते अधिक स्पष्ट हे च प्रश्न अतिशय भावनात्मक आणि संघर्षाच्या बाबतीत पुढे येतांना दिसतात. ते कैलास दौंड यांच्या कापूसकाळ या कादंबरीतून दिसून येते कापूस पिकाच्या निमित्ताने शेतकऱ्यांचे जगणे या कादंबरीतून फारच प्रभावीपणे व्यक्त झालेले आहे. मराठीतील अगदी मोचक्या कादंबऱ्यामध्ये कापूसकाळचा समावेश होतो. कोणत्याही चळवळीत आंदोलनातून संघटनेकडे असा प्रवास अपरिहार्यपणे होतो. ग्रामीण

साहित्याची चळवळ याच रीतीने पुढे जायला पाहिजे. ग्रामीण साहित्याची चळवळ सामाजिक परिवर्तनासाठी आहे. परिवर्तनासाठी आवश्यक असलेली उर्जा साहित्यिकाच्या लेखनातून मिळत असते.

**निष्कर्ष :**

१. ग्रामीण साहित्य प्रामुख्याने ग्रामीण जीवनातील विविध समस्या संस्कृती, भाषा, रुढी, परंपरा, रिती, रिवाज, शेती, शेतकर्याचे प्रश्न, नाती–गोती, अश्या विविध समस्यांचे चित्रण करते.
२. ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने माणसाचे साहित्य आहे. माणूस स्वतहाला बदलू शकतो तसेच तो आपल्या भावतीचे वास्तव विचाराने आणि कृतीने बदलू शकतो. हे प्रमुख विचारसुत आहेत.
३. ग्रामीण संस्कृतीचे, तिच्यातील साऱ्या घटितांचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात उमटत असते.
४. ग्रामीण साहित्यामधून ग्रामीण भागातील अनेक प्रश्न आणि समस्या पुढे आणल्या जात आहेत.
५. ग्रामीण साहित्याची चळवळ ही सामाजिक परिवर्तनासाठी आहे.
६. ग्रामीण साहित्य निर्मितीमागे ग्रामीण जाणीव असते.
७. ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष चित्रण होते.
८. ग्रामीण जीवनात होणारे राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचे वास्तववादी प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात येऊ लागले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव–आनंद यादव
२. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि वास्तवता – आनंद यादव
३. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध डॉ.नागनाथ कोत्तापल्ले
४. मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड सातवा भाग–२
५. लोकसाहित्य स्वरूप– डॉ.प्रभाकर मांडे
६. लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा–डॉ.रा.ची ढेरे
७. स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाह– य.च.म.मु.विद्यापीठ
८. साहित्यदर्शन – डॉ.दिलीप गायकवाड



CamScanner